# किल्ले तळगड

चंद्रशेखर सावंत

**या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!**

# किल्ले तळगड

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख. आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो. मजा येते.

## पण तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

## आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या. लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या. मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# किल्ले तळगड

(दुर्गवर्णन)

लेखक : चंद्रशेखर नम्रता नथुराम सावंत

# किल्ले तळगड

## लेखक - चंद्रशेखर नम्रता नथुराम सावंत

फोन नंबर - +९१ ९९३० ५६ ०४५८

ब्लॉग: cnsawant.blogspot.com

ई-मेल: shekharsawant1111@gmail.com

पत्ता - शिवकोकण-ऐक्यवर्धक सहकारी गृहनिर्माण संस्था,ए-१, ए-९०२, ९ वा मजला, पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या जवळ,शांताराम तलाव, मालाड (पूर्व), मुंबई : ४०० ०९७

**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.**

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १९ डिसेंबर २०२२

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# चंद्रशेखर नम्रता नथुराम सावंत

टोपण नाव : शेखर किंवा विकी
गाव : मु.पो. नांदवी, जिल्हा: रायगड - ४०२ १०३
पत्ता: शिवकोकण-ऐक्यवर्धक सहकारी गृहनिर्माण संस्था, ए-१, ए-९०२, ९ वा मजला, पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या जवळ, शांताराम तलाव, मालाड (पूर्व), मुंबई : ४०० ०९७
भ्रमणध्वनी: +९१ ९९३० ५६ ०४५८
ब्लॉग: cnsawant.blogspot.com
https://wayfarershekhar.blogspot.com/

ई-मेल: shekharsawant1111@gmail.com

छंद: गिर्यारोहण, ट्रॅव्हल आणि लिखाण

## !!आभार!!

सर्वप्रथम ई- साहित्य प्रतिष्टान' या संपूर्ण समूहाचे मनापासून आभार मानतो. त्यांनी मराठी लेखक व वाचक यांना त्यांची असलेली वाचनाची व लिखाणाची आवड वृद्धिंगत होत जावी तसेच आजकालच्या इंटरनेटच्या युगात ई-पुस्तक स्वरूपात पुस्तके निर्माण करण्याचे फार मोलाचे व मोठे सत्कार्य त्यांच्याकडून सुरु आहे. याचा मला फार आनंद वाटतो व मनापासुन अभिमान आहे. ई साहित्य प्रतिष्ठान च्या संकेतस्थळावर माझे किल्ले सोंडाई, किल्ले कर्नाळा, किल्ले कोथळीगड व अनुभवांचा संगम-शिखर कळसुबाई हे ई-पुस्तके प्रकाशित झाली, याचा मला फार आनंद आहे. रायगड जिल्ह्यातील इंदापूरच्या जवळच असलेल्या तळा गावातील 'तळगड' येथील अनुभवांचे वर्णन मी ह्या ई-पुस्तकातून मांडणार आहे. आशा बाळगतो कि फार आनंदाने याचे स्वीकार कराल. तत्पूर्वी मी केलेल्या गडांवर गिर्यारोहणच्या अनुभवाचे लेखन मी माझ्या ब्लॉग वर केले आहे. ई-साहित्य प्रतिष्ठानमुळे मी दुर्ग दुर्घटभारी व प्रवासवर्णन या विषयाशी जोडला गेलो.

संपूर्ण ई-साहित्य प्रतिष्ठान चे मनापासून आभार व असंख्य शुभेच्छा.

***चंद्रशेखर सावंत***

# अर्पण पत्रिका

निर्विवाद सिंहपुरूष, ज्यांचे नाव कानावर येताच
छाती अभिमानाने फुलवणाऱ्या
हिंदवी स्वराज्य संस्थापक
छत्रपती शिवाजी महाराज
यांच्या चरणी कृतज्ञतापुर्वक अर्पण.

--/ चंद्रशेखर सावंत

# तळगड- एक अपरिचित किल्ला

पुरंदरच्या तहामध्ये महाराजांनी १२ किल्ले स्वतःकडे ठेवले. त्यापैकी असलेला हा तळगड.

**चंद्रशेखर नम्रता नथुराम सावंत**

# किल्ले तळगड

# नकाशा


तळागड
बुरूज
शौचकूप
वास्तू
सुकलेलं टाकं
टाकं
बुरूज
शौचकूप
घोसाळगड
अवचितगड
तळा गाव
खांब टाकं
मारुती
शरभ
दरवाजा
प्रवेश
वास्तू
ध्वज
पायऱ्या
-उद्ध्वस्त वास्तू
फलक
तळा गावाकडे
TREKSHITIZ.COM
तळा गाव
18°17'33.28"N, 73° 8'11.46"E

मी सहसा आत्ता एकट्याने करायचा प्रवास टाळतो. पण निसर्गाची ओढच मला आकर्षून घेते आणि मला राहवत नाही. अवचितगड येथे एकट्याने केलेल्या प्रवासानंतर कुठे एकट्याने केलेले गिर्यारोहण कुठचं असेल तर तळा या गावातील ‘तळगड’.

मुंबई येथून राहत्या घरातून  सकाळी ४:३० ला शांततेत निघून केलेला हा प्रवास आयुष्यासाठी खूप ताजेतवाने करणारा होता. गाडी मध्ये घेतलेली झोप सुद्धा ताजेतवाने करणारी होती.  हा किल्ला माझ्या गावाकडील नजीकच्याच परिसरातील असल्यामुळे रस्ता सुद्धा मला आवडणारा होता. रायगड जिल्ह्यातल्या माणगांव तालुक्याचे १९९९ मध्ये विभाजन झाले व तळा तालुका निर्माण झाला. तळा तालुक्यात प्रवेश करताच उंच कड्यासारखा डोंगर लक्ष वेधून घेतो. तळा गावाच्या पश्चिमेस देवाच्या डोंगराच्या पुर्वेकडील तुटक शिखरावर तळागड किल्ला आहे. तळगड हा किल्ला तसा लहान आहे. त्यामुळे याचे गडावरील क्षेत्रफळ सुद्धा कमी आहे. हा गड दक्षि दक्षिण दिशेने पसरलेला आहे. या किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची तटबंदी अजूनही भक्कम आहे. गडावरचे अनेक ठिकाणचे बुरुज चांगल्या स्थितीत अजूनही आहेत.

तळा येथील नगरपंचायतीचे प्रवेशद्वार

गडावर जाण्यासाठी

असलेला मुख्यप्रवेशद्वार

# गडावर पोहोचण्याच्या वाटा

HAPPINESS IS A DIRECTION NOT A

तळगड हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे. रोह्याच्या आजुबाजुला अनेक डोंगररांगा पसरलेल्या आहेत. या डोंगररांगावर अनेक किल्ले ठाण मांडून बसलेले आहेत. त्यापैंकी तळागड हा किल्ला कुंडलिका नदी समुद्राला जेथे मिळते त्या मांदाड खाडीवर नजर ठेवण्यासाठी बांधण्यात आला होता. प्राचीन काळी कुंडलिका नदी मार्गे कोकणातील बंदरात उतरणारा माल घाटावर जात असे. या व्यापारी मार्गावर बांधलेली कुडा लेणी, अवचितगड, घोसाळगड आणि तळागड हे किल्ले या मार्गाच्या प्राचीनत्वाची साक्ष देत अजूनही उभे आहेत.

इ.स. १६४८ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी तळागड आदिलशहाकडून जिंकून घेतला. इ.स. १६५९ मध्ये अफजलखानाच्या स्वारीच्या वेळी सिद्दीने तळागडाला वेढा घातला होता. पण अफजलखानाच्या पराभवाची बातमी मिळाल्यावर सिद्दीने वेढा उठवला. पुरंदरच्या तहामध्ये महाराजांनी १२ किल्ले स्वतःकडे ठेवले. त्यामध्ये तळगड हा एक होता. यावरूनच या किल्ल्याचे महत्त्व आपणास समजते.

शिवाजी महाराजांच्या निधनानंतर हा किल्ला सिद्दीकडे गेला. इ.स. १७३५ मध्ये पहील्या बाजीराव पेशव्यांनी हा किल्ला जिंकून घेतला. पुढे इ.स. १६५९ मध्ये पन्हाळगडावर महाराज सिद्धी जोहरच्या वेढ्यात गुंतले असताना जंजिरेकर सिद्धीने तळागड आणि घोसाळगडास वेढा घातला, पण महाराजांच्या सुटकेची बातमी कळताच सिद्धी वेढा उठवून जंजिरेस पळून गेला. इ.स.१६४८ मध्ये शिवाजी महाराजांनी तळागड आदिलशहाकडून जिंकून घेतला. इ.स. १६५९ मध्ये अफजलखानाच्या स्वारीच्या वेळी सिद्दीने तळागडाला वेढा घातला होता. पण अफजलखानाच्या पराभवाची बातमी मिळाल्यावर सिद्दीने वेढा उठवला. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर हा किल्ला सिद्दीकडे गेला. इ.स. १७३५ मध्ये पहील्या बाजीराव पेशव्यांनी हा किल्ला जिंकून घेतला. पुढे मराठा इंग्रज युद्धात १७ एप्रिल १८१८ मध्ये इंग्रज अधिकारी कर्नल प्रॉथरने गडाचा पाडाव करून गड ताब्यात घेतला.

किल्ल्यात शिरतांना पडझड झालेला दरवाजा लागतो तो म्हणजे हनुमान दरवाजा. या हनुमान दरवाजाच्या उजव्या कोपऱ्यात मारुतीची सुंदर मूर्ती कोरलेली आहे. येथेच खडकात कोरलेले खांब टाके आहे.टाक्या जवळच प्रवेशव्दारावरील शरभाचे शिल्प पडलेले आहे.

दरवाजातून आत गेल्यावर गडमाथ्यावर प्रवेश करण्यापूर्वी बांधीव पायऱ्या व प्रवेशव्दाराचे अवशेष पाहायला मिळतात. गडमाथ्यावर उजव्या बाजूला दोन मजली भक्कम बुरूज पाहायला मिळतो. थोड्याच अंतरावर मंदिराचे जोत व ३ पाण्याची टाकी आढळतात. गडाच्या सर्वोच्च माथ्यावर कातळात खोदलेली सात पाण्याची टाकी त्याच्या पुढे लक्ष्मी कोठार नावाची वास्तू पाहायला मिळते. पुढे उत्तरेकडे चालत गेल्यावर टोकावर बुरुज आहे. गडावर अनेक ठिकाणी घरांचे आणि वाड्यांचे अवशेष आढळतात.किल्ल्यावरून घोसाळगड, मांदाड खाडी,. कुडा लेण्यांचा डोंगर असा सर्व परिसर दिसतो. बंदरात उतरलेला माल घाटावर नेण्यासाठी कुडा-भाजे-बोरघाट-पैठण हा व्यापारी मार्ग अस्तित्वात होता. या घाटवाटांच्या रक्षणासाठी तळागड आणि घोसाळा किल्ला जवळपास दोन हजार वर्षांपूर्वी सातवाहनांनी बांधला असावा. नंतर पुढे हे किल्ले आदीलशहाच्या ताब्यात गेल्यावर सोडवलेकर व कोडवलेकर सरदारांची तळा आणि घोसाळा किल्ल्यावर गडकरी म्हणून नेमणूक करण्यात आली होती.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर हा किल्ला जंजिरेकर सिद्धीच्या ताब्यात गेला. नंतर इ.स. १७३५ मध्ये पहील्या बाजीराव पेशव्यांनी हा किल्ला जिंकून घेतला. त्याच वर्षीच्या सिद्दी-मराठे तहानुसार या गडाची मालकी मराठ्यांकडे राहिली.

किल्ल्यात शिरतांना पडझड झालेला दरवाजा लागतो तो म्हणजे हनुमान दरवाजा. या हनुमान दरवाजाच्या उजव्या कोपऱ्यात मारुतीची सुंदर मूर्ती कोरलेली आहे. येथेच खडकात कोरलेले खांब टाके आहे. टाक्या जवळच प्रवेशद्वारावरील शरभाचे शिल्प आपल्याला दीसुन येतात. दरवाजातून आत गेल्यावर गडमाथ्यावर प्रवेश करण्यापूर्वी बांधीव पायऱ्या व प्रवेशद्वाराचे अवशेष पाहायला मिळतात. गडमाथ्यावर उजव्या बाजूला दोन मजली भक्कम बुरूज पाहायला मिळतो. थोड्याच अंतरावर मंदिराचे जोत व ३ पाण्याची टाकी आढळतात. गडाच्या सर्वोच्च माथ्यावर कातळात खोदलेली सात पाण्याची टाकी त्याच्या पुढे लक्ष्मी कोठार नावाची वास्तू पाहायला मिळते. पुढे उत्तरेकडे चालत गेल्यावर टोकावर बुरुज आहे. गडावर अनेक ठिकाणी घरांचे आणि वाड्यांचे अवशेष आढळतात. किल्ल्यावरून घोसाळगड, मांदाड खाडी, कुडा लेण्यांचा डोंगर असा सर्व परिसर दिसतो.

## ❖ गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे

### हनुमान दरवाजा -

किल्ल्यात प्रवेश करताना कड्याच्या खाली उत्तर बाजूस पडझड झालेल्या अवस्थेत पहिला दरवाजा लागतो तो हनुमान दरवाजा. त्यासमोरच कातळावर कोरलेली हनुमानाचे शिल्प कोरलेले आहे, यावरूनच हनुमान दरवाजा असे नाव दिले गेले असावे. जवळच कातळकड्यात पाण्याचे टाके आहे. पूर्वेकडे कड्याच्या खाली तटबंदी आहे.

## बालेकिल्ला-

बुरूजावरून पुढे गेल्यावर समोरच पडक्या अवस्थेत दरवाजा आहे त्यातून आत प्रवेश केल्यावर आपण बालेकिल्ल्यात पोहचतो. त्यापुढे गेल्यावर दुसरी तटबंदी सुरू होते. उत्तर आणि दक्षिणेस तटबंदी असून पुर्व आणि पश्चिमेच्या टोकाला बुरूज आहेत.

## दुमजली बुरूज-

बालेकिल्ल्यात प्रवेश केल्यावर उजव्या दिशेला पडक्या अवस्थेत दुमजली बुरूज असून झेंड्याची ढालकाठी दिसते. ती किल्ल्याची सर्वात उंच जागा आहे. वरच्या भागातील दरवाजाजवळ पूर्व बाजूस बुरूज आणि मशिदीचे अवशेष आहेत. त्यापुढे पश्चिमेस गेल्यावर तीन टाकी दिसतात.

## चोरदरवाजा-

बालेकिल्ल्यात प्रवेश केल्यावर पश्चिमेकडील टोकास चालत राहिल्यावर तटबंदीला लागून एक चोरदरवाजा असून सध्या तो बुजलेल्या अवस्थेत आहे. आपत्कालीन प्रसंगी गडावरून दोरीने बाहेर पडण्यासाठीचा हा मार्ग होता.

## कचेरी आणि धान्यकोठार-

पश्चिमेच्या दिशेला बुरुजाच्या दिशेस जाताना कचेरीचे काही अवशेष आहेत. जवळच एक धान्यकोठार असून येथे आल्यावर निवांत वाटते.

## पाण्याच्या टाक्या-

किल्ल्यात हनुमान दरवाजाजवळ एक हनुमान दरवाज्याजवळची एक पाण्याची टाकी फक्त मी डोळयांनी बघितली कारण दोन्ही हाताचा संघर्ष करून चढाई करून त्या पाण्याच्या टाकीचे दर्शन होणार होते आणि मी एकटाच असल्यामुळे छायाचित्र काय काढायला जमले नाही. वर बालेकिल्ल्यात 9 अश्या एकूण 10 पाण्याच्या टाक्या असून त्यातील काही टाक्या कोरड्या अवस्थेत आहेत.

**महादेवाचे मंदिर-** बालेकिल्ल्यात दगडी शिवलिंग असलेले, छत नसलेले, महादेवाचे दगडी देऊळ इतिहासाची साक्ष देत उभे आहे.

# गडावरील आकर्षक छायाचित्रे

AYYAN
MINIDOR

## ❖ पोहोचण्याच्या वाटा

खाजगी वाहन असेल तर उत्तमच. त्यामुळे रस्त्याची मज्जा सुद्धा घेता येते आणि भूक लागली तर हव्या त्या ठिकाणी भोजनालयात थांबता सुद्धा येते.

दिव्याहून सकाळी ६.०० वाजता सुटणारी दिवा - मडगाव पॅसेंजर ९.३० वाजता इंदापूरला पोहोचते. संध्याकाळी मडगाव - दिवा पॅसेंजर इंदापूरला १५.५५ वाजता आहे.

मुंबई - गोवा महामार्गावर मुंबई पासून १२८ किमी अंतरावर इंदापूर गाव आहे. इंदापूर गावापासून तळागाव १५ किमी अंतरावर आहे. इंदापूर गावातून रिक्षा किंवा बसने तळा गावात जाता येते. तळागावातूनच किल्ल्यावर जाण्याची मुख्य वाट आहे.गावातून किल्ल्यावर जाण्यासाठी एकच वाट आहे. या वाटेने गडावर जातांना पहिल्या टप्प्यावर एक छोटीशी सपाटी लागते. दुसरा टप्पा म्हणजे गडाच्या माचीचा भाग आणि तिसरा भाग म्हणजे किल्ल्याच्या अंर्तभागात असणारे प्रशस्त पठारच होय. पायथ्यापासून किल्ल्यावर जाण्यास अर्धा तास लागतो. इंदापूरला जाण्याचा दुसरा मार्ग म्हणजे कोकण रेल्वे.

मुंबई - गोवा महामार्गावर मुंबई पासून १२८ कि. मी. अंतरावर इंदापूर गाव आहे. इंदापूर गावापासून तळागाव १५ कि. मी. अंतरावर आहे. इंदापूर गावातून रिक्षा किंवा बसने तळागावात जाता येते. तळागावातूनच किल्ल्यावर जाण्याची मुख्य वाट आहे. गावातून किल्ल्यावर जाण्यासाठी एकच वाट आहे. या वाटेने गडावर जातांना पहिल्या टप्प्यावर एक छोटीशी सपाटी लागते. दुसरा टप्पा म्हणजे गडाच्या माचीचा भाग आणि तिसरा भाग म्हणजे किल्ल्याच्या अंतर्भागात असणारे प्रशस्त पठारच होय. पायथ्यापासून किल्ल्यावर जाण्यास अर्धा तास लागतो. तळा हे पायथ्याचे गाव आणि तालुकाचं ठिकाण असून ते मुंबई पासून १६० कि.मी. अंतरावर आणि पुण्यापासून १३० कि.मी. अंतरावर आहे.

किल्ल्याविषयी थोडक्यात माहिती

- किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
- उंची : २५६ मीटर
- डोंगररांग: रोहा
- जिल्हा : रायगड
- श्रेणी : मध्यम
- राहाण्याची सोय : किल्ल्यावर राहण्याची सोय नाही.
- जेवणाची सोय : तळगावात भोजनालये आहेत.
- पाण्याची सोय : किल्ल्यावर बारामही पिणाच्या पाणाच्या टाक्या आहेत.
- जाण्यासाठी लागणारा वेळ : तळा गावातून विस मिनिटे ते अर्धातास लागतो.

टीप : गिर्यारोहणादरम्यान काळजीपूर्वक स्वतःसाठी **२ लिटर पाण्याच्या भरलेल्या बाटल्या, सुखा खाऊ, Glucon-D, Electral, Energy Drink** इत्यादी निदान एवढे तर घ्याच पण **किल्ल्यावर मात्र कुठेही कचरा टाकू नका**. आपापल्या सॅक मध्ये किंवा खिशामध्ये हा कचरा ठेवा व नंतर कचराकुंडीमध्ये टाकून द्या.

# पोहोचण्यासाठी मुंबई आणि पुण्याहून पोहोचण्यासाठी नकाशे

## पुण्याहून



मुंबईहून



ठाणे
Ambernath
अंबरनाथ
ANDHERI EAST
अंधेरी ईस्ट
Mumbai
DADAR
दादर
FORT
Vangani
वांगणी
Matheran
माथेरान
3 hr 34 min
135 km
4 hr 1 min
129 km
Karjat
कर्जत
Khandi
खंडी
Khopoli
खोपोली
Lonavala
लोणावळा
Malavli
मळवली
Kihim
किहिम
Washi
वाशी
Pen
पेण
Dolvi
डोलवी
Alibag
अलिबाग
Kurvande
कुर्वंडे
Nagaon
नागाव
Aamby Valley City
Bhalgul
भालगुल
Revdanda
रेवदंडा
Nagothane
नागोठणे
Pali
पाली
Mulshi
मुळशी
Patnus
पाटणुस
Phansad Wildlife Sanctuary
फणसाड अभयारण्य
Roha
रोहा
Kolad
कोलाड
Bhagad
भागड
Lavasa
लवासा
Murud
Mangaon
माणगाव
Talgad Fort
Dighi
दिघी
Raigad
रायगड

**ऋणनिर्देश**

TreKshitiZ Sanstha, MSRTC, Google

व गावातील स्थानिक रहिवासी

चंद्रशेखर सावंत यांची इतर चार पुस्तके. फक्त कव्हरवर फ़क्त एक क्लिक. पुस्तक हजर









दुर्ग दुर्घट भारी

आसेतूहिमाचल

सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

**कुठे शोधिशी स्वित्झर्लंड अन कुठे पहाशी तुर्की?**

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या “मी पाहिलेला…” सिरीजमध्ये भाग घेऊ

शकतो. याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. ज्या वाटेवर फिरण्यात तुम्हाला आनंद वाटतो तो वाटेचा आनंद वाटेल तेव्हा वाटत रहा.

**कुठे शोधिशी स्वित्झर्लंड अन कुठे शोधिशी तुर्की?**

**सौंदर्याचे निधान आहे तुझ्या गावच्या वेशी!**

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा. बाकी आम्ही बघू.

esahity@gmail.com